
दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | रविवार, 24 मे 2026 | अंक क्र. 22 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com




# दावोस करारांना वेग महाराष्ट्र बनणार देशाचा 'डेटा सेंटर हब' मुख्यमंत्री फडणवीसांचे निर्देश

## 10 अधिकाऱ्यांवर 100 प्रकल्प वेळेत पूर्ण करण्याची जबाबदारी

■ **मुंबई :वृत्तसंस्था**

स्वित्झर्लंडमधील दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेत झालेल्या सामंजस्य करारांची अंमलबजावणी आता वेगाने करण्यासाठी राज्य सरकारने मोठे पाऊल उचलले आहे. औद्योगिक, पायाभूत सुविधा, शैक्षणिक, स्मार्ट सिटी, डेटा सेंटर आणि शाश्वत विकासाशी संबंधित प्रकल्पांना निश्चित कालमर्यादेत पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्री Devendra Fadnavis यांनी दिले आहेत.

सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत मुख्यमंत्र्यांनी एमआयडीसी, उद्योग संचालनालय आणि मंत्रालयातील १० प्रमुख अधिकाऱ्यांना प्रत्येकी १० प्रकल्प वेळेत पूर्ण करण्याची जबाबदारी सोपविण्याचे निर्देश दिले. यामुळे तब्बल १०० महत्त्वाच्या प्रकल्पांच्या अंमलबजावणीवर थेट नियंत्रण ठेवले जाणार आहे.

मुख्यमंत्र्यांनी प्रशासनाला स्पष्ट सूचना देताना सांगितले की, कंपन्यांच्या पाठपुराव्याची वाट न पाहता जमीन वाटप, पर्यावरण मंजुरी, बांधकाम आराखडे आणि विविध परवानग्या पुढील तीन




महिन्यांत पूर्ण कराव्यात. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र डेटा सेंटर क्षेत्रात देशातील सर्वात मोठे गुंतवणूक केंद्र बनण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल करत आहे. राज्यात सध्या अनेक डेटा सेंटर प्रकल्प 'इन्व्हेस्टमेंट इन प्रोग्रेस' टप्प्यात असून त्यातून मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक अपेक्षित आहे.

या डेटा सेंटरसाठी लागणारी ऊर्जा आणि पाणी महाराष्ट्रात मुबलक उपलब्ध असल्याने प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी मोठी संधी निर्माण झाली आहे. प्रक्रिया सुलभीकरण, जागा उपलब्धता आणि वितरण क्षमता वाढविण्यावर भर देण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले.

नवी मुंबई राज्यातील प्रमुख डेटा सेंटर हब म्हणून उदयास येत असून महापे परिसरात मोठ्या प्रकल्पांना गती मिळाली आहे. तसेच खालापूरला तिसरे महत्त्वाचे डेटा सेंटर क्लस्टर म्हणून विकसित करण्याचे नियोजन सुरू असून पनवेल परिसरातील पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्यावर भर दिला जात आहे.

उत्पादन क्षेत्रात इलेक्ट्रॉनिक्स, चिप्स, एरोस्पेस, वस्त्रोद्योग, वाहन उद्योग आणि संरक्षण क्षेत्रातील प्रकल्पांना प्राधान्य, तर सेवा क्षेत्रात डेटा सेंटर, आयटी-आयटीईएस, फिनटेक आणि ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर (GCC) प्रकल्पांना गती देण्याचे निर्देश देण्यात आले. याशिवाय सिडकोमार्फत राबविण्यात येणाऱ्या एरोसिटी परिसरातील विद्यापीठ प्रकल्प, लॉजिस्टिक पार्क, एंटरटेनमेंट हब, डेटा सेंटर आणि स्टुडिओ अपार्टमेंट्स प्रकल्पांनाही वेग देण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले. दावोस करारांची प्रभावी अंमलबजावणी करत महाराष्ट्राला औद्योगिक आणि डिजिटल महासत्ता बनविण्याच्या दिशेने राज्य सरकारने निर्णायक पाऊल उचलल्याचे या बैठकीतून स्पष्ट झाले.



# पांगरीचे पोलीस पाटील माऊली मुंडे आणि राम कराड यांचा 'मथुराई' निवासस्थानी सत्कार!

■ **परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

तालुक्यातील पांगरी गावचे पोलीस पाटील श्री. माऊली मुंडे यांना नुकताच अत्यंत प्रतिष्ठेचा 'राज्यपाल पुरस्कार' मिळाल्याबद्दल, तसेच गावातील तरुण श्री. राम रत्नहार कराड यांची 'महानिर्मिती' (महाजेनको) मध्ये तंत्रज्ञ-३ (Technician-3) पदी निवड झाल्याबद्दल पांगरी येथे त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला.

'मथुराई' निवासस्थानी आयोजित करण्यात आलेल्या एका विशेष कार्यक्रमात गावातील प्रमुख मान्यवरांच्या हस्ते या दोन्ही गुणवंतांना सन्मानित करण्यात आले. एकाच वेळी गावाला प्रशासकीय पुरस्कार आणि तरुणाला हक्काची शासकीय नोकरी मिळाल्यामुळे संपूर्ण पांगरी गावात सध्या आनंदाचे वातावरण आहे.

या कौतुक सोहळ्याप्रसंगी परिसरातील आणि गावातील राजकीय, सामाजिक क्षेत्रातील अनेक दिग्गज उपस्थित होते. सत्कार करताना बाजार समितीचे माजी संचालक मा. सुर्यकांत मुंडे, माजी सरपंच मोहन मुंडे, माजी सरपंच सुदाम मुंडे यांच्यासह राजाभाऊ मुंडे, मधुकर मुंडे, पोलीस पाटील लक्ष्मण दिवटे, विश्वनाथ मुंडे, मंचक मुंडे, भागवत मुंडे, रत्नाहार कराड, विठ्ठल मुंडे, भानुदास दिवटे, सुग्रीव मुंडे, विष्णू मुंडे, मारोती व्हावळे आदींची प्रमुख उपस्थिती होती.पोलीस पाटील माऊली मुंडे यांनी आपल्या कर्तृत्वाने गावाची मान जिल्ह्यात आणि राज्यात उंचावली आहे, तर राम कराड याने अत्यंत कष्टाने महानिर्मितीमध्ये मिळवलेले यश हे गावातील इतर तरुण पिढीसाठी नक्कीच प्रेरणादायी ठरेल, अशा भावना यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केल्या. या कार्यक्रमाला पांगरी गावातील ग्रामस्थ आणि तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिर्डीत अत्याधुनिक संरक्षणशास्त्र संकुलाचे लोकार्पण!

## भारत लवकरच जगातील सर्वात मोठा संरक्षण निर्यातदार देश बनेल: केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह



■ **शिर्डी (प्रतिनिधी)**

### महाराष्ट्राला छत्रपती शिवाजी महाराजांचा समृद्ध वारसा!

■ **भारताच्या संरक्षण उद्योगाला ऐतिहासिक परंपरा लाभली असल्याचे सांगताना संरक्षणमंत्र्यांनी महाराष्ट्राच्या भूमीचे विशेष कौतुक केले. ते म्हणाले की, "महाराष्ट्राला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या 'आत्मनिर्भर लष्करी आणि नौदल उभारणीचा' अत्यंत समृद्ध व प्रेरणादायी वारसा लाभला आहे. हाच वारसा पुढे नेण्यात निबे समूहासारखे प्रकल्प महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत."**

" भारत आता केवळ शस्त्रास्त्रांची आयात करणारा देश राहिलेला नाही. केंद्र सरकारच्या धोरणात्मक बदलांमुळे भारत लवकरच जगातील एक प्रमुख आणि मोठा संरक्षण निर्यातदार (Defense Exporter) देश म्हणून उदयास येईल," असा ठाम विश्वास केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी व्यक्त केला. शिर्डी एमआयडीसी (MIDC) येथील 'निबे समूहाच्या' अत्याधुनिक संरक्षणशास्त्र संकुल आणि तोफगोळा (आर्टिलरी शेल) उत्पादन प्रकल्पाच्या भव्य लोकार्पण सोहळ्यात ते मुख्य अतिथी म्हणून बोलत होते.

या ऐतिहासिक सोहळ्याला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ (CDS) जनरल अनिल चौहान, उद्योगमंत्री उदय सामंत, महसूल व पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, तसेच निबे समूहाचे अध्यक्ष गणेश निबे आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.

खाजगी क्षेत्राचा वाटा ३० टक्क्यांवर!

कार्यक्रमात बोलताना राजनाथ सिंह म्हणाले की, "पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'आत्मनिर्भर भारत' संकल्पनेमुळे देशाच्या संरक्षण उत्पादन क्षेत्रात खाजगी उद्योगांना खूप मोठ्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. केंद्र शासनाने घेतलेले धोरणात्मक निर्णय, थेट परकीय गुंतवणुकीला (FDI) प्रोत्साहन, परवाना पद्धतीचे सरळीकरण आणि स्वदेशीकरणाला दिलेली चालना यामुळे खाजगी क्षेत्राचा सहभाग लक्षणीय वाढला आहे." संरक्षण उत्पादनातील खाजगी क्षेत्राचा वाटा आता २५ ते ३० टक्क्यांपर्यंत पोहोचला असून, भारतीय उद्योग कोणत्याही जागतिक आव्हानाला सामोरे जाण्यास पूर्णपणे सक्षम आहेत, असा गौरवपूर्ण उल्लेख त्यांनी केला.

# राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी प्रणित प्रोटॉन संघटनेचे उपजिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

## प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी (प्रोटॉन) विंग यांचा पुढाकार

■ **अंबाजोगाई (प्रतिनिधी)**

राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघ प्रणित प्रोफेसर, टीचर ॲण्ड नॉनटीचिंग एम्प्लाइज (प्रोटान) संघटने मार्फत महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांतील ३५८ तालुक्यात तीन टप्प्यांत एकाचवेळी आंदोलन करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून अंबाजोगाई येथे प्राध्यापक, शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी, अंगणवाडी सेविका, निम्नसेवक, विषय तज्ज्ञ, तासिका (सीएचबी) तत्वावरील प्राध्यापक यांच्या नवनवीन समस्यांवर एकदिवसीय आंदोलन करून शुक्रवारी अंबाजोगाई (जि.बीड) येथे उपजिल्हाधिकारी यांना निवेदन दिले.

येथील राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघ प्रणीत प्रोफेसर्स, टीचर्स ॲण्ड नॉन टीचिंग एम्प्लाइज विंग (प्रोटान) संघटन मार्फत महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांत तीन टप्प्यांत सर्व तहसीलदार, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, अंगणवाडी सेविका, शिक्षण सेवक, विषय तज्ज्ञ, तासिका (सीएचबी) तत्वावरील प्राध्यापक यांच्या विविध समस्यांवर



एकदिवसीय जिल्हास्तरिय धरणा प्रदर्शन आंदोलन करण्यात आले. शिक्षण क्षेत्रातील विविध मागण्यांसाठी, त्यांच्या संविधानिक हक्क अधिकारासाठी लढणारे प्रोटॉन हे प्राध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे एकमेव बहुजन कर्मचारी संघटन आहे.

शासन, प्रशासन आणि न्यायालयात अनेक वर्षांपासून प्रलंबित असणारे प्रश्न ही संघटना यशस्वीपणे सोडवित आहे. सरकार एकीकडे कायदा दुरूस्ती करून सुध्दा अनेक कायदेशीर तरतुदी राखून ठेवते आणि दुसरीकडे त्यांच्या अंमलबजावणी साठी दुर्लक्ष करून कर्मचाऱ्यांवर होत असलेल्या अन्यायाचे निवारण करीत, एकीकडे कायद्याने बंधनकारक अटींवर शैक्षणिक व प्रशासकीय स्तरांवर सरकारचे दुर्लक्ष होऊन अन्यायकारक वागणूक मिळत आहे, तर अनिर्देशित न्यायप्रविष्टतेच्या नांवाखाली टाळाटाळ करीत आहेत. न्यायालयीन आदेशांच्या अधीन राहून निर्णय घेणे शक्य असताना ही सरकार अनेक प्राध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना न्यायापासून वंचित ठेवत आहे. कांही कर्मचाऱ्यांना प्रत्यक्ष न्यायनिवडा झाला तरी समय सीमा अनुल्लेखामुळे अन्याय दूर केला जात नाही. म्हणूनच जे सार्वजनिक प्रश्न संघटनेने हाक देऊन ही उपरोक्त कारणांनी सरकारला अद्यापही सोडविता आले नाहीत, त्याचा निषेध व्यक्त करून सरकारला जागे करण्यासाठी प्रोटॉन शुक्रवार, दि.२२ मे २०२६ रोजी, तहसीलदार/जिल्हाधिकारी यांना निवेदन देणे, ०५ जून २०२६ रोजी जिल्हास्तरीय

### प्रोटॉन संघटनेच्या प्रमुख मागण्या :

- **शिक्षक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडवाव्यात.,**
- **शाळा व महाविद्यालये टिकली राहावीत यासाठी ठोस धोरण राबवावे.**
- **अन्यायकारक शासन आदेश तात्काळ रद्द करावेत.**

धरणे आंदोलन आणि ५ जुलै २०२६ रोजी राज्यस्तरीय रॅली असे तीन टप्प्यांत राज्यव्यापी आंदोलने करणार आहेत. प्राध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतन नियुक्ती, पदोन्नती, वेतन आयोग, वरिष्ठ व निवडश्रेणी कायम मान्यता, पूर्णवेळ मान्यता, समान वेतन, किमान वेतन, सीएएस प्रक्रिया, अतिरिक्त समायोजन, शाळा महाविद्यालय बंद करण्याचे धोरण या अनुषंगाने होणारी अडवणूक आणि पिळवणूक या विषयी संघटनेकडून नित्य संघर्ष सुरू आहे.

# सिंहगड किल्ल्यावरून परतताना अपघात; दुचाकी दरीत पडली, तरुण-तरुणी गंभीर जखमी

■ **पुणे : वृत्तसंस्था**

पुण्यातील (Pune) प्रसिद्ध सिंहगड (Sinhagad) किल्ला परिसरात एक भीषण अपघात घडल्याने मोठी खळबळ उडाली आहे. सिंहगड घाटातील ११ हजार पॉईंट परिसरात दुचाकी (Two-Wheeler) थेट खोल दरीत कोसळल्याने दोन पर्यटक गंभीर जखमी झाले आहेत. या अपघातात पूजा चव्हाण आणि सौरव पासलकर हे दोघे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. सिंहगड किल्ल्यावरून घाटमार्गाने खाली येत असताना दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने हा भीषण अपघात (Accident) घडल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

### चालकाचं दुचाकीवरील नियंत्रण सुटलं आणि...

मिळालेल्या माहितीनुसार, पूजा चव्हाण आणि सौरव पासलकर हे दोघे सिंहगड किल्ल्यावरून दुचाकीवरून खाली येत होते. घाटातील वळणदार रस्त्यावरून प्रवास करत असताना अचानक चालकाचं दुचाकीवरील नियंत्रण सुटलं. त्यानंतर दुचाकी थेट रस्त्यालगतच्या खोल दरीत जाऊन कोसळली. हा अपघात इतका गंभीर होता की दुचाकी दरीत कोसळल्यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली.

घटनेची माहिती मिळताच वनविभाग, वन समितीचे कर्मचारी, स्थानिक नागरिक, पर्यटक तसेच आपत्ती व्यवस्थापन पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. दरीचा परिसर अत्यंत कठीण आणि धोकादायक असल्याने बचावकार्य राबवताना पथकांना मोठी कसरत करावी लागली.

### जखमींना दरीतून सुखरूप बाहेर काढण्यात यश

अपघातानंतर सुरू करण्यात आलेल्या बचाव मोहिमेत (Rescue Operation) वनविभाग, आपत्ती व्यवस्थापन पथक, स्थानिक नागरिक आणि पर्यटकांनी संयुक्तपणे मदतकार्य केले. अथक प्रयत्नांनंतर दोन्ही जखमींना दरीतून सुखरूप बाहेर काढण्यात बचाव पथकाला यश आले. त्यानंतर त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

या अपघातात पूजा चव्हाण हिच्या पायाला गंभीर दुखापत झाली असून तिच्या पायाच्या इतर भागांनाही फ्रॅक्चर झाल्याची माहिती समोर आली आहे. तर सौरव पासलकर याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून त्याच्यावर वैद्यकीय उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे सिंहगड घाट परिसरात काही काळ चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. सुदैवाने वेळीच मदतकार्य सुरू झाल्याने दोघांचे प्राण वाचवण्यात यश आले.

# चला फिरा अरुणाचल प्रदेश

अरुणाचल प्रदेश हे भारत ईशान्येकडील एक लोकप्रिय पर्यटन आहे. येथील झिरो हे सर्वात महत्त्वाचे स्थळ आहे. देवांचे शहर म्हणून याची ख्याती आहे. याठिकाणी एका प्रेरणेपेक्षा काही कमी नाही, दृष्टीस पडेल त्या प्रत्येक कोपऱ्यात एक आश्चर्य आहे आणि अशा बेसुमार ठिकाणांमुळे, अनेकदा एखादा पर्याय सुटू शकतो. गोष्टी सोप्या करून देण्यासाठी, येथे अरुणाचल प्रदेशातील झिरोमधील उत्तम ठिकाणे दिली आहेत.



## दऱ्यातील सर्व मार्ग

अरुणाचल प्रदेशातील टॅली व्हॅली अभयारण्य अनेक पर्यटकांना आकर्षित करते. तो अनेक चिंताजनक प्रजातींचे घर आहे असे म्हणतात. हे ठिकाण ऑर्किड, सिल्व्हर ओक आणि फर्नसह अनेक वनस्पती आणि त्यांच्या प्रजातीने समृद्ध आहे. पाच हजार वर्षे जुन्या आणि बहुतेक १९६२ मध्ये शोध लावण्यात आलेल्या मेघना गुहा मंदिराला नक्की भेट द्या.


## टेकडी चढणे

भर दुपारच्या वेळी आपटनी खोऱ्यातील विखुरलेली ब्लू अल्पाइनची झाडे बिंदू आहेत. ट्रेकिंगसाठी बूट घाला आणि या जागेत मनसोक्त हुंदडा. टोकडीवरील झिरो पुटो म्हणून ओळखले जाणारे ठिकाण प्रशासकीय मूल्य आहे. आपाटनी खोऱ्यात एक नेत्रदीपक दृश्य यामुळे दिसते आहे. हापोलीला जिल्हा प्रशासकीय मुख्यालय वसलेले आहे.

## मासे पकडायला जा

टरिन माश्यांची शेती देवदार आणि बांबूच्या उपवनाच्या दरम्यान जवळ आहे. अनेक माशांचे येथे प्रजनन आहे. बांबूचे उपवन एक रोमांचक ठिकाण आहे. जे निळ्या अल्पाइननेयुक्त आहे आणि हायकिंग आणि लांब ट्रेकिंगसाठी अभ्यागतांना पर्याय देते. टिपी ऑर्किड रिसर्च सेंटरने उष्णदेशीय पाऊस वनामध्ये आसरा घेतलेला आणि हे ऑर्किडच्या सुमारे १००० प्रजातींचे घर आहे. यामुळे पिशव्या पॅक करून अरुणाचल प्रदेशाचे आश्चर्यकारक जग अनुभवण्यास तयार व्हा.

# दैत्यासूर धबधबा



आंबिवलीहून पुढे जामरूग गावाकडे जाणाऱ्या वाटेवरील पुलाच्या आधी उजवीकडे वळल्यावर आपण डुक्कर पाड्यात पोहोचतो. येथूनच पुढे अनेक खासगी फार्म हाऊसचे प्रकल्प आहेत. हे फार्म हाऊस ज्या डोंगराच्या पायथ्याशी बांधले आहेत त्या डोंगराच्या माथ्यावर एक नैसर्गिक भगदाड म्हणजेच नेढे असल्यामुळे याला नाखिंडाचा डोंगर असे स्थानिक संबोधतात. कोथळीगडाच्या मध्यावर असलेल्या पेठेची वाडी गावाच्या समांतर उंचीवर नाखिंडा डोंगरालाही पदर सुटला आहे. (स्थानिके भाषेतील पदर म्हणजे एका विशिष्ट उंचीवर डोंगराला समांतर असलेले विस्तीर्ण पठार) याच पदरावरून अनेक धबधबे रांगेत खाली कोसळत असतात. यातलाच सर्वात मोठा धबधबा म्हणजेच दैत्यासूर धबधबा. कातळ भिंतीवरून रांगेत कोसळणारे हे धबधबे सजावटीसाठी लावलेल्या बत्ताशांच्या माळांप्रमाणे भासतात. या धबधब्याच्या तळाशी जाण्यासाठी तासाभराची बिकट चढाई करावी लागते. अजस्त्र धबधब्याचे रौद्र भीषण रूप पाहणे हा वेगळा अनुभव असला तरी तेथे जाणं धोक्याचे आहे. कारण हा प्रपात खूप उंचावरून कोसळत असतो. बिकट चढाईचे श्रम घ्यायचे नसल्यास फार्म हाऊसच्या प्रोजेक्टच्या मागे दोनचार कमी प्रवाहाचे धबधबे आहेत. तेथे पोहोचणे सोपे असून येथे धबधब्या खाली भिजण्याचा आनंद घेता येतो.



## सोलान पाडा बंधारा

कर्जत रेल्वेस्थानकापासून अंदाजे ३० किलोमीटर अंतरावर असलेल्या जामरूग गावाच्या पुढे सोलान पाडा नावाची छोटीशी वाडी आहे. या वाडीच्या पुढे डोंगर पायथ्याशी हल्लीच एक छोटासा बंधारा बांधण्यात आला. बंधाऱ्याचे अतिरिक्त पाणी वाहून जाण्यासाठी केलेल्या सांडव्याची टप्प्या टप्प्यात उतरत जाणारी अशी विशिष्ट पद्धतीची केलेली बांधणी पर्यटकांच्या लोंढ्याला कारणीभूत ठरत आहे. धरण भरले की अतिरिक्त पाणी लयबद्ध पद्धतीने एका टप्प्यावरून दुसऱ्यावर, दुसऱ्यावरून तिसऱ्या टप्प्यावर ओसंडून वाहू लागते आणि पाहणाऱ्याला एकावर एक असे अनेक धबधबे पहिल्याचा आनंद मिळतो. हे टप्पे जास्त खोल नसल्यामुळे येथे भिजण्यासाठी पर्यटकांची मोठी गर्दी जमते. अर्थात ही गर्दी टाळून थोडसे मागे डोंगराजवळ जायला हरकत नाही. अगदीच डोंगरधारेला लागून असलेल्या या धरणाच्या जलाशयाच्या नयनरम्य देखाव्याला सुरेख जोड लाभली आहे ती पाठीशी उभ्या असलेल्या कातळ भिंतीवरून रांगेत कोसळणाऱ्या धबधब्यांची. नजर खिळवून ठेवणारा असाच हा नजारा म्हणावा लागेल. गेल्या दोन वर्षांपासून सोशल मीडियावरून होणाऱ्या मोठ्या प्रसिद्धीमुळे सुट्टीच्या दिवशी येथे हजारोंच्या संख्येने पर्यटक जमू लागले आहेत. त्यामुळेच सुट्टीचे दिवस टाळून मध्येच एखादी खास रजा काढून येथे आवूर्जन भेट द्यायला हरकत नाही.

# खडसांबळे लेणी

अष्टविनायकातील पाली गावापासून १४ किलोमीटर अंतरावर खडसांबळे नावाचे एक छोटेसे गाव आहे. याच गावाच्या पाठीमागे डोंगरात मध्यावर एक लेणी समूह कोरलेला आहे. चहू बाजूने जंगलाने वेढलेल्या या लेण्यांना भेट द्यायची झाल्यास गावातून वाटाड्या घेणे आवश्यक ठरते. गावापासून लेण्यांपर्यंत पोहोचायला तासाभराची सोपी चढाई करावी लागते. पण थोडे कष्ट घेऊन पठारावर पोहोचताच येथील हिरवाईने नटलेला निसर्ग पाहून घेतलेल्या श्रमाचे चीज होते. दूर दूरवर पसरलेले हिरवे गवताच्छादीत पठार, त्यापलीकडे गुटख्यापासून ते थेट हिरडीपर्यंत (गुटखा-हिरडी ही घाटमाथ्यावरील गावे आहेत) आडवी पसरलेली सह्यधार आणि त्यावरून मुसंडी मारून वाहणारे अनेक धबधबे असा नयनरम्य देखावा निरखत पुन्हा जंगलात शिरायचे आणि थेट लेणी गाठायची.



लेण्यांच्या समोर येताच विशेष लक्ष वेधून घेतो तो येथील विस्तीर्ण सभागृह. मात्र दरड कोसळून व छत खचून त्यातील बहुतांश गुहांचा प्रवेश बंद झाला आहे. डोंगरमाथ्यावरून ओघळणारे पाणी लेणींच्या थेट पुढ्यात कोसळते. श्रावणात येथे गेल्यास या पाण्यावर पडणाऱ्या तिरप्या सूर्यकिरणांमुळे पाण्यात एकात एक गुरफटलेली अनेक इंद्रधनुष्य पाहायला मिळतात. खडसांबळे लेण्यांची सफर एका अपरिचित वारसास्थळाची भेट आणि सुगम्य जंगल भटकंती असा दुहेरी आनंद देऊन जाते.

# विवाह सोहळ्यासाठी शाही ठिकाणे

प्रत्येकाच्या आयुष्यात विवाह सोहळा हा फार महत्त्वाचा असतो. तो चांगल्या पद्धतीने आणि चांगल्या ठिकाणी करणे ही सगळ्यांची इच्छा असते. तसेच हे क्षण आयुष्यभर आठवणीत राहतात. याला अधिकच रोमँटिक करण्यासाठी निवडा पुढील शाही ठिकाणे...

## शाही राजस्थान

ऐतिहासिक पार्श्वभूमी असल्यामुळे राजस्थान नेहमीच शाही थाटासाठी ओळखला जातो. राज पॅलेस, राम बाघ पॅलेस आमी जय महाल पॅलेस येथे लग्न सोहळा तुमच्यासाठी अविस्मरणीय ठरू शकतो. उदयपूर येथील द लेक पॅलेस हॉटेल हा आणखी सर्वोत्तम ऑप्शन असू शकतो. राजस्थानमधील जयपूर, उदयपूर आणि जोधपूर ही शहरे देशातील प्रमुख शहरांशी रस्ते मार्गाने जोडली गेली आहेत.

## ॲडव्हेंचरस अंदमान

हिरवाईने नटलेला भूप्रदेश, स्वच्छ पाण्याचा अथांग समुद्र आणि सुंदर किनारा अशी पार्श्वभूमी लग्न सोहळ्यासाठी अतिशय उत्तम ठरू शकते. अंदमान-निकोबार बेटे एक सध्या भारताती उत्तम वेडिंग डेस्टिनेशन्सपैकी एक मानले जाते. ॲडव्हेंचरची हौस असणाऱ्या कपल्स ना येथे वॉटर स्पोर्टस्‌चा आनंद देखील घेता येऊ शकतो. येथे तुम्ही हवाई मार्गाने तसेच समुद्रमार्गे जहाजातून जावू शकता.



## हाऊसबोट

लग्न सोहळ्यासाठी समुद्र किनारा असलेले आणखी एक ठिकाण म्हणजे केरळ. तुम्हाला शांतता अनुभवायाची तर केरळ अतिशय सुंदर आहे. कोल्लम, कोटी आणि वरका येथील बॅकवॉटरमध्ये असलेल्या हाउस बोटमध्ये लग्न समारंभ संस्मरणीय ठरू शकते. येथे बस, कार, रेल्वे आणि विमानानेही जाऊ शकता.



# मिझोराम

मिझोराम हे ईशान्येकडील सात राज्यांतील एक छोटेसे राज्य. मिझोरामची राजधानी असलेले ऐझवाल हे गुवाहाटीपासून ५०६ कि.मी., शिलाँगपासून ४५० कि.मी. आणि इम्फाळपासून ३७४ कि.मी. दूर आहे. सिलचर हे जवळचे रेल्वेस्थानक असून ते १८४ कि.मी. अंतरावर आहे. सर्व रस्ते सिलचरमार्गेच जातात. त्यामुळे रस्त्याने ऐजवाल गाठायला गुवाहाटीपासून दीड दिवस लागतो. गुवाहाटी व कोलकाता येथून विमानाने ऐझवालला येता येते.

मिझोराम हे हिरव्यागार डोंगररांगांनी व्यापलेले आहे. राज्याचे सर्वात उंच शिखर फावांगपुई (७०७५ फूट) हे म्यानमारच्या सीमेवर आहे. या डोंगररांगेला ब्ल्यू माउंटन म्हणून ओळखले जाते. राज्याची भाषा मिझो असल्याने येथील लोकांशी संपर्क साधताना भाषेची थोडी अडचण येते. मुख्य उत्पन्नाचे साधन शेती. तीही जंगल कापून काही काळासाठी करण्यात येते. येथे बांबूची लागवड मोठ्या प्रमाणात होत असल्याने दैनंदिन गरजांसाठी बांबूचा उपयोग मोठ्या प्रमाणात होतो. त्यामुळे तेथे आपल्याला घरेही बांबूचीच पाहायला मिळतील. मिझो संस्कृतीतील दहा नृत्यप्रकारांपैकी चेराव म्हणजे बांबूनृत्य पर्यटकांसाठी पर्वणी असते. ऐजवालमधील झुलॉजिकल पार्क, म्युझियम प्रेक्षणीय आहे. तेथील बडा बाजार नावाची मुख्य बाजारपेठ प्रसिद्ध आहे. इथल्या हॉटेलांत चायनीजबरोबरच भात, भाकरी, वरण हमखास मिळते.

ऐझवालपासून ८५ किमीवर प्रेक्षणीय तामदिल तलाव, १५२ किमीवर ७५० फूट उंचीचा वांटावांग धबधबा व १३३ कि.मी.वर दाम्पा अभयारण्य आहे. ऐजवालहून खुंआंगचेरा गाव, तेथील छोटे भुयार, रेईक शिखर व तेथील मिझो पर्यटन ग्राम असा एक दिवसाचा गाडीने भटकंतीचा कार्यक्रम करता येतो. मिझोरामच्या भटकंतीसाठी ऑक्टोबर ते मार्च हा कालावधी उत्तम असतो. हे सीमावर्ती राज्य असल्याने येथे प्रवेशासाठी परवाना घ्यावा लागतो. हा परवाना दिल्ली, गुवाहाटी येथे मिझोराम सरकारच्या जनसंपर्क कार्यालयांबरोबरच ऐझवाल विमानतळावर मिळतो.

# मेघालय



मेघालय हे ईशान्येकडील राज्यांतील बांगलादेशच्या सीमेला लागून असलेले एक छोटेसे राज्य. नावाप्रमाणेच मेघांचा आलय असलेले सर्वाधिक पर्जन्यमानाचे राज्य. संपूर्ण मेघालय गारो, खासी व जैतिया टेकड्यांनी व्यापलेला आहे. या वेगवेगळ्या टेकड्यांच्या प्रदेशात राहणाऱ्या जमातीही या टेकड्यांच्याच नावाने म्हणजे गारो, खासी, जैतिया या नावाने ओळखल्या जातात. मेघालयातील बहुतांश लोकसंख्या ही या जमातींची आहे. सुमारे ३०० प्रकारचे ऑर्किड, दोन राष्ट्रीय उद्याने, अनेक प्रकारचे वन्य प्राणी यांनी समृद्ध असे हे राज्य आहे. येथील भटकंतीसाठी ऑक्टोबर ते एप्रिल हा कालावधी अनुकूल आहे. जून ते सप्टेंबर या दरम्यान येथे प्रचंड पाऊस असतो.

## शिलाँग

गुवाहाटीपासून ९० किलोमीटरवर शिलाँग हे मेघालयाच्या राजधानीचे शहर आहे. येथे सर्व शहरी सुविधा आहेत. प्रवासासाठी बस व जीप गाड्या यांची सेवा चांगली आहे. रस्तेही चांगले आहेत. शिलाँगकडे जाताना १७ किलोमीटर अलीकडे, प्रचंड मोठा असा उमियाम जलाशय आहे. हा सर्व परिसर अत्यंत रम्य आहे. शिलाँगपासून १० किलोमीटरवर शिलाँग शिखर (६४४५ फूट) आहे. येथून शिलाँग शहराचे विहंगम दृश्य पाहायला मिळते.

शहरापासून दहा- बारा किलोमीटरच्या परिसरात स्प्रेड इगल, स्वीट, एलेफंट अशा नावांचे धबधबे आहेत. शिलाँगपासून ५४ कि.मी. अंतरावर चेरापुंजी येथून हिरव्या रंगाने नटलेल्या खोल दऱ्या, मोसमाई, दैन्थलेन, नोहकेलीकाई या नावाचे व असे अनेक धबधबे व बांगलादेशचा पठारी प्रदेश नजरेस पडतो. येथून ५५ किमीवर मोंहसिराम हे आता सर्वाधिक पर्जन्यमान असणारे ठिकाण म्हणून ओळखले जाते. याच पट्ट्यात दऱ्या-खोऱ्यांमध्ये लिविंग रुट ब्रिज हे नैसर्गिक आश्चर्य खास पाहण्याजोगे आहेत. ओढे, नाले ओलांडून जाण्यासाठी असे ३५ अवाढव्य पूल या परिसरात आहेत. खासी जमातीचा नोंगक्रेम सण व गारो जमातीचा वांगाला डान्स नोव्हेंबरमध्ये तर जैतियांचा बेह देन्खलाम सण जुलैमध्ये असतो.



## हजारो भुयारे

आपल्या देशात नैसर्गिक भुयारे फक्त मेघालय राज्यात आहेत. मेघालयाच्या टेकड्यांमध्ये असलेला चुनखडीचा खडक व सर्वाधिक पर्जन्यमान या घटकांमुळे मेघालयात हजारो भुयारांची निर्मिती झाली आहे. ही भुयारं भूगर्भ शास्त्रज्ञ व इतर अभ्यासकांसाठी नंदनवन म्हणावी लागतील. साहसाची व नित्य नव्याचा वेध घेण्याची ओढ असणाऱ्यांसाठी एक आव्हानच आहे. अशा या भुयारातून पृथ्वीच्या अंतरंगाचा वेध घेत केलेल्या साहसी मार्गक्रमणाला केव्हिंग संबोधले जाते. या केव्हिंगसाठी प्रस्तरारोहणाच्या तंत्राचा तर काही ठिकाणी वॉटर डायव्हिंग तंत्राचा वापर करावा लागतो. आतापर्यंत शोध घेतलेले सर्वात लांब भुयार ३१ कि.मी. लांबीचे आहे. नैसर्गिकरित्या या गुहांमध्ये तयार झालेल्या नानाविध रचना पाहताना आपण वेगळ्याच जगात आहोत की काय असा भास होतो. चेरापुंजीत मोसमाई नावाचे भुयार आहे. या भुयारातील मार्ग योग्य त्या सुविधा करून सोपा केलेला असल्याने पर्यटकांना या भुयाराची अनुभूती घेता येते.

# पावसाळी भटकंती


पावसाळा म्हटले की डोंगर, दऱ्या पादाक्रांत करण्यात भरपूर मजा येते. हिरव्या रंगाने नटलेले डोंगर पर्यटकांना खुणावत असतात. वीकेण्डला अशा पिकनिकची मजा लुटली की संपूर्ण आठवडा एकदम मस्त मूडमध्ये जातो. यासाठीच काही पर्यटनस्थळे..

## भिवगड

कर्जतपासून आठ किलोमीटरवरील गौरकामत गावाजवळ भिवगड/भीमगड नावाचा एक छोटा किल्ला आहे. अवघ्या अर्ध्या तासाच्या सोप्या चढाईने माथा गाठता येणाऱ्या या किल्ल्यावर पाण्याची काही टाकी, दगडी पायऱ्या आणि वाड्याचे चौथरेवगळता इतर वास्तू जवळजवळ नामशेष झाल्या आहेत. मात्र, गड-माथ्यावरून दिसणारा सभोवतालचा हिरवाकंच देखावा नजर खिळवून ठेवतो. हिरव्यागार शेतात डोक्यावर रंगीबेरंगी इरली घेऊन राबणारे शेतकरी, पाठीमागच्या ढाकच्या डोंगरावरील घनदाट वनराई, त्यातून कोसळणाऱ्या धबधब्यांच्या पांढऱ्या रेषा आणि अंग मोहरून टाकणारा गार वारा हे सारे अनुभवण्यासारखे आहे. हिरवाईच्या शौकिनांनी पावसाळ्यात आवर्जून भेट द्यावी असे हे ठिकाण. येथून जवळच एका खिंडीत मोठा धबधबा आहे. तास-दोन तासात गडफेरी आटोपून धबधब्यावर चिंब भिजण्याची मजा लुटता येऊ शकते.

## काळदुर्ग

माहीम-केळवे डोंगर रांगेतील पालघरजवळील एक छोटासा किल्ला म्हणजे काळदुर्ग. पालघर-मनोर गाडी रस्त्यादरम्यान लागणाऱ्या वाघोबाच्या खिंडीपासून सुरू होणारा घडीव पायरस्ता आपल्याला तासाभराच्या सोप्या चढाईने काळदुर्गावर घेऊन जातो. जंगल भटकंतीचा आनंद लुटत टप्प्याटप्प्याने चढणाऱ्या पायवाटेने डोंगरमाथा गाठल्यावर दृष्टीस पडणारा सभोवतालचा रम्य देखावा डोंगर चढाईचा शीण कुठल्या कुठे पळवून लावतो. सूर्या नदीचे विस्तीर्ण खोरे, सूर्या-वैतरणा संगम, क्षितिजाशी अरबी समुद्राची निळाई तर पलीकडे तांदूळवाडी किल्ल्यापर्यंत नागमोडी पसरलेली डोंगररांग. शहरी जीवनाचा विसर पाडायला लावणारे निसर्गसौंदर्य. वाघोबाच्या खिंडीतून येणारे वाहतुकीचे आवाजच काय ते आपण शहरात असल्याची जाणीव करून देतात. माथ्याच्या छोट्याशा विस्तारात ३-४ पाण्याची टाकी पाहायला मिळतात. बाकी अवशेष तसे फारसे काही शिल्लक नाहीत.



## खिरेश्वरचे नागेश्वर मंदिर

खळाळत वाहणारे असंख्य झरे, डोंगरदऱ्यात खोलवर उतरत जाणारे ढगांचे पुंजके, त्याआडून डोकावणारे सह्याद्रीचे कडे असे नजरेला भुरळ पडणारे निसर्गसौंदर्य भटक्यांना पावसाळ्यात माळशेज घाटात हमखास खेचून आणते. घाटातील गर्दी टाळून आवर्जून भेट द्यावे असे एक देखणे वास्तुशिल्प येथील खिरेश्वर गावी दडलेले आहे. हरिश्चंद्र गडाच्या पायथ्याचे गाव म्हणजे खिरेश्वर. घाट चढून आल्यावर काही अंतरावर लागणाऱ्या खुबी फाट्यावरून डावीकडे (मुंबईकडून नगरकडे जाताना) जाणाऱ्या कच्च्या रस्त्याने ४ किलोमीटरच्या अंतरावर वसलेले हे छोटेसे गाव. ही कच्ची सडक म्हणजे धरणाचा बंधारा होय. त्यामुळे उजवीकडे क्षितिजापर्यंत पसरलेल्या निळाईत आजूबाजूच्या डोंगरांचे पडलेले प्रतिबिंब पाहत असता आपण गावात कधी पोहोचतो हे समजतच नाही.



# मोहिली धबधबा

### कसे जाल ?

नाशिकहून कल्याणमार्गे कर्जतला जावे. कर्जत स्थानकावरून श्रीराम पुलावरून रिक्षाने मोहिलीकडे जाता येते. स्वतःचे वाहन असेल तर अधिक सोयीचे .

पावसाळ्यात उंच डोंगरमाथ्यावरून कोसळणारे पांढरेशुभ्र धबधबे पाहणे हे पर्यटकांसाठी एक अविस्मरणीय अनुभव असतो. कर्जत तालुक्याला निसर्गाने मोहिली धबधबा हे देणे दिले आहे. मोहिली धबधबा हा कर्जत पासून ६ ते ७ कि.मी. लांब आहे. उल्हास नदी पार करून प्रत्यक्ष मोहिलीत प्रवेश होतो. डोंगरावरून भिरभिरणारा वारा , हिरवीगार वनराई, तेथून दिसणारा आजूबाजूचा निसर्ग असे नयनरम्य दृश्य डोळ्यांत साठवून ठेवावे असे वाटते . डोंगरमाथ्यावरून मुंबई-पुणे रेल्वेचा रस्ताही दिसतो . धबधब्याजवळ पर्यटकांची हॉटेल्स आहेत. मोहिली धबध्ब्याजवळ थंड वातावरणात गरमगरम वाफाळता चहा आणि मक्याची कणसे खाण्याची मजाच काही औरच आहे असे इथे येणारे पर्यटक सांगतात. यापुढे ७-८ किलोमीटर दूर गेल्यास कोंडाणा परिसरातही अनेक धबधबे आहेत .

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)





# मलिकपुरा परिसरात सुरू असलेल्या विविध विकासकामांची बाजीराव भैय्या धर्माधिकारी व पदाधिकाऱ्यांकडून पाहणी!

**परळी वैजनाथ, प्रतिनिधी....**

परळी शहरातील मलिकपुरा भागामध्ये जिल्हा वार्षिक योजना 2025-26 अंतर्गत नागरी दलितेत्तर योजनेमधून करण्यात आलेल्या रस्ता व नाली बांधकामाची प्रत्यक्ष पाहणी माजी नगराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी व न.प.पदाधिकाऱ्यांकडून पाहणी करण्यात आली. या विकासकामांमुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून स्वच्छता, वाहतूक व्यवस्था आणि दैनंदिन जीवनमानात सुधारणा होणार असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

मलिकपुरा भागातील जामा मज्जीद ते अफसर शेख, निजाम शेख व मेहराज सर यांच्या घरापर्यंत सुमारे ५० लाख रुपये खर्चून नाली व रस्ता बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे. तसेच हबीबपुरा मज्जीद परिसरातील रस्त्याचे कामही २६ लाख रुपये खर्चून नुकतेच पूर्ण झाले आहे. यावेळी मलिकपुरा भागातील रस्ते व नालेसफाई कामांची पाहणी करून नागरिकांशी संवाद साधण्यात आला. नागरिकांच्या समस्या, सूचना आणि अपेक्षा जाणून घेत येणाऱ्या 2026-27 च्या डीपीडीसी अंतर्गत या प्रभागात आणखी विकासकामे प्रस्तावित करण्याबाबतही प्रत्यक्ष आढावा घेण्यात आला. राज्याचे माजी मंत्री तथा परळी विधानसभा मतदारसंघाचे आमदार धनंजय मुंडे आणि राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या नेतृत्वाखाली परळी नगर परिषद शहरात सर्वांगिण, समतोल व लोकाभिमुख विकास घडवण्यासाठी कटिबद्ध असल्याचे यावेळी बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी सांगितले. यावेळी माजी नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, राष्ट्रवादी काँग्रेसचे नगर परिषद गटनेते वैजनाथ सोळंके, भाजप नेते निळकंठ चाटे, बांधकाम सभापती प्रा. पवन मुंडे, स्वच्छता सभापती श्रीकृष्ण कराड, नगरसेवक हाजी बाबा, रमेश पवार, नगर अभियंता ज्ञानेश्वर ढवळे यांच्यासह कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.




## "तु मेरे साथ शादी कर, मेरे साथ शादी नही की तो मै तुझे भगाके लेके जाऊंगा" परळीत काय घडले ?

### परळीत तरुणीचा हात धरून विनयभंग 'तु मेरे साथ शादी कर' म्हणत धमकावणाऱ्या आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल

**परळी प्रतिनिधी**

परळी शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका १८ वर्षीय तरुणीचा रस्ता अडवून, विनयभंग केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. "तु मेरे साथ शादी कर, मेरे साथ शादी नही की तो मै तुझे भगाके लेके जाऊंगा" अशी धमकी देत तरुणीच्या मनाला लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करणाऱ्या आरोपीविरुद्ध परळी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस रिपोर्टमधील माहितीनुसार, आरोपी अमरु शेख याने पीडितेच्या जवळ जाऊन तिचा हात धरला. त्याने पीडितेला "तु माझ्याशी लग्न कर, जर लग्न केले नाही तर तुला पळवून नेईन" अशी धमकी दिली. सदर कारवाई परळी शहर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी मा. पोलीस निरीक्षक नाचन साहेब यां च्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. दाखल अंमलदार घुगे असून, पुढील अधिक तपास पोलीस हवालदार जाधव हे करत आहेत.

## ज्ञानबोधिनी प्राथमिक विद्यालयाचा विद्यार्थी रमण तोष्णीवाल शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश संपादन

फेब्रुवारी महिन्यात महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या मार्फत घेण्यात आलेल्या इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून या परीक्षेत ज्ञानबोधिनी प्राथमिक विद्यालयाचा विद्यार्थी चि. रमण विजयकुमार तोष्णीवाल याने उल्लेखनीय यश संपादन करत शिष्यवृत्तीसाठी पात्रता मिळविली आहे. रमणच्या या यशामुळे शाळा, पालक तसेच संपूर्ण संस्थेमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

शिष्यवृत्ती परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमता, आकलनशक्ती, अभ्यासातील सातत्य आणि स्पर्धात्मक तयारीची खरी कसोटी मानली जाते. अशा या स्पर्धात्मक परीक्षेत रमणने उत्कृष्ट कामगिरी करत विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. त्याच्या या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळाली असून विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे.

रमणच्या या यशाबद्दल अखिल भारतीय संस्कृत प्रचारिणी संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती वर्षाताई मुंडे मॅडम यांनी त्याचे विशेष अभिनंदन केले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्था सातत्याने प्रयत्नशील असल्याचे सांगत रमणच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. संस्थेचे सन्माननीय सचिव श्री लक्ष्मण मुंडे सर यांनीही रमणचे कौतुक करत त्याच्या मेहनतीबरोबरच शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य हे यशामागील महत्त्वाचे घटक असल्याचे नमूद केले. तसेच संस्थेचे



उपाध्यक्ष आदरणीय श्री प्रशांत मुंडे सर यांनी रमणला पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देत भविष्यातही असेच यश संपादन करण्याचा विश्वास व्यक्त केला.

रमणच्या यशाबद्दल बोलताना त्याचे पालक श्री विजयकुमार तोष्णीवाल यांनी भावना व्यक्त करताना सांगितले की, ज्ञानबोधिनी प्राथमिक विद्यालयामध्ये विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी विशेष प्रयत्न केले जातात. वर्षभर नियमित शालेय अभ्यासासोबतच स्कॉलरशिप परीक्षेसाठी अतिरिक्त तासिका घेण्यात आल्या. रविवारी विशेष वर्गांचे आयोजन करण्यात आले तसेच वेळोवेळी सराव परीक्षा घेऊन विद्यार्थ्यांची तयारी अधिक भक्कम करण्यात आली. या सर्व नियोजनबद्ध प्रयत्नांमुळेच रमणला हे यश मिळू शकले, असे त्यांनी नमूद केले.

यावेळी त्यांनी ज्ञानबोधिनी प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री लक्ष्मण मुंडे सर यांचे विशेष आभार मानले. विद्यार्थ्यांना सातत्याने प्रोत्साहन देऊन योग्य दिशा दाखविण्याचे कार्य त्यांनी केले असल्याचे सांगितले. तसेच स्कॉलरशिप विभाग प्रमुख श्रीमती आघाव मॅडम यांनी विद्यार्थ्यांना अत्यंत संयमाने व जिद्दीने मार्गदर्शन केले. त्यांच्या परिश्रमांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला आणि परीक्षेची भीती दूर झाली, असेही त्यांनी सांगितले.

विद्यालयातील शिक्षकवर्गानेदेखील रमणच्या यशाचे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी नियमित अभ्यास, शिस्त आणि सातत्य यांचा अवलंब केल्यास कोणतेही यश सहज मिळविता येते, असे मत शिक्षकांनी व्यक्त केले. रमणच्या यशामुळे विद्यालयातील इतर विद्यार्थ्यांमध्येही स्पर्धात्मक परीक्षांविषयी उत्साह निर्माण झाला आहे.

ज्ञानबोधिनी प्राथमिक विद्यालय हे केवळ शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यावर भर देत नसून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहे. विविध स्पर्धा परीक्षा, उपक्रम, मार्गदर्शन वर्ग आणि सराव चाचण्यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सक्षम बनविण्याचे कार्य विद्यालयामार्फत केले जाते. रमणच्या यशामुळे विद्यालयाच्या या प्रयत्नांना आणखी बळ मिळाले असून भविष्यातही अशाच प्रकारे अनेक विद्यार्थी यश संपादन करतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

रमण विजयकुमार तोष्णीवाल याच्या या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यालयातील सर्व शिक्षक-शिक्षिका, कर्मचारीवर्ग, विद्यार्थी तसेच पालकवर्ग यांनी त्याचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

# वाळवा तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांचे गुणवत्ता परीक्षांमध्ये उज्वल यश !

### सांगली जिल्ह्यात वाळवा पंचायत समिती गुणवत्तेत दुसऱ्या क्रमांकावर !

---

### गुणवत्ता परीक्षेत २१५ विद्यार्थी चमकले जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीत !

---

### इयत्ता पाचवीच्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत २७९ विद्यार्थी पात्र !

सांगली जिल्हा परिषदेच्या वतीने २०२५-२६ या शैक्षणिक वर्षामध्ये जिल्हा परिषद शाळेतील इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या गुणवत्ता शोध परीक्षांमध्ये वाळवा तालुक्यातील २१५ विद्यार्थी जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीत चमकले असून संपूर्ण सांगली जिल्ह्यात वाळवा तालुका गुणवत्तेत दुसऱ्या क्रमांकावर राहिला आहे.

इयत्ता चौथीच्या डॉ. पतंगराव कदम शिष्यवृत्ती परीक्षेत २७ विद्यार्थ्यांनी तर सातवीच्या २५ विद्यार्थ्यांनी जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीत स्थान पटकावले आहे. इयत्ता पहिलीच्या गुणवत्ता शोध परीक्षेत ५३, दुसरीच्या ३९, तिसरीच्या ४९ आणि सहावीच्या २७ विद्यार्थ्यांनी जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीत स्थान पटकावत उज्वल यश संपादन केले आहे.



काळमवाडी येथील जिल्हा परिषद शाळेतील इयत्ता पहिलीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करताना सांगली जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा सौ.संगिता पाटील, जिल्हा परिषद सदस्या श्रीमती संध्याताई पाटील, पंचायत समिती सदस्या सौ. सुप्रिया पाटील, प्रकाश पाटील, सरपंच सौ. सविता सावंत, हर्षवर्धन पाटील, दीपक रोकडे

फेब्रुवारी २०२६ मध्ये महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषदेच्या वतीने घेण्यात आलेल्या इयत्ता पाचवीच्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत वाळवा तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांनी उज्वल यश संपादन केले आहे. या परीक्षेत संपूर्ण वाळवा तालुक्यातील ६३ शाळांमधील २७९ विद्यार्थी पात्र ठरले आहेत. तालुक्यातील ७६३ विद्यार्थी परीक्षेत बसले होते. तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा काळमवाडी, नेर्ले नंबर १, महादेववाडी, जाक्राईवाडी, इटकरे, पेठची उर्दू शाळा, इस्लामपूरची उर्दू शाळा या शाळांचे ६०% पेक्षा अधिक विद्यार्थी पात्र ठरले आहेत.

वाळवा तालुक्याचे गटविकास अधिकारी डॉ. आबासाहेब पवार, गटशिक्षणाधिकारी सुनील आंबी, शिक्षण विस्तार अधिकारी सौ. छायादेवी माळी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व इयत्तांच्या गुणवत्ता वाढीसाठी विशेष मार्गदर्शन वर्षभर सुरू होते. गटविकास अधिकारी डॉ. आबासाहेब पवार यांच्या मार्गदर्शनाखाली वाळवा तालुक्यात वर्ग पडताळणी अभियान हा विशेष उपक्रम गेली दोन वर्षे घेतला जात आहे. याचबरोबर डिजिटल क्लासरूमच्या माध्यमातून तालुक्यातील सर्व शाळांना तज्ञ शिक्षकांचे गुणवत्ता परीक्षांबाबत मार्गदर्शन मिळत आहे. प्रत्येक शाळेत वर्ग पातळीवर परीक्षांचा सराव होतोच, त्याचबरोबर पंचायत समितीच्या माध्यमातून अधिक सराव होण्यासाठी प्रत्येक वर्गाच्या पाच सराव चाचण्या घेतल्या गेल्या होत्या. त्यामुळेच सर्वच इयत्तांचा गुणवत्तेचा आलेख उंचावलेला दिसून येत आहे. प्रत्येक वर्गातील पात्र विद्यार्थ्यांचा टक्का निश्चितच वाढलेला आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे, मार्गदर्शक शिक्षकांचे आणि प्रेरणा देणाऱ्या अधिकाऱ्यांचे अभिनंदन सांगली जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा सौ. संगीता पाटील, तालुक्याचे सभापती उदयसिंह पाटील, उपसभापती प्रकाश पाटील यांनी केले आहे. गेल्या काही वर्षात वाळवा तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमधून वाढत असलेली विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता निश्चितच काम उल्लेखकाम आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील पालकांचा ओढा जिल्हा परिषदेच्या शाळांकडे वाढत आहे, हे निश्चित !

**बीडीओ डॉ.आबासाहेब पवार यांचे शैक्षणिक गुणवत्ता आढावा अभियान**

वाळवा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी डॉ. आबासाहेब पवार यांनी गेली दोन वर्षे वाळवा तालुक्यात शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी तालुक्यातील वर्गांची गुणवत्ता आढावा अभियान राबवत आहेत. विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी इयत्ता पहिलीपासून चौथीपर्यंतच्या वर्गांचा गुणवत्ता आढावा घेतला जात आहे. केंद्रवार हे अभियान राबवले जात आहे. यासाठी गटशिक्षणाधिकारी सुनील आंबी यांच्या मार्गदर्शनाखाली, शिक्षण विस्तार अधिकारी सौ. छायादेवी माळी आणि केंद्रप्रमुखांचे पथक तयार केले असून वर्षभरात शाळा पाहणीचे केंद्रवार नियोजन केले जाते. गुणवत्तेचा आढावा घेऊन संबंधित शिक्षकांना सूचना केल्या जात आहेत. गुणवत्ता पूर्ण वर्ग असणाऱ्या शिक्षकांचे अभिनंदनही केले जाते. या अभियानामुळे शिक्षक गुणवत्ता वाढीसाठी अधिक सतर्क राहत असून सर्व वर्गांच्या गुणवत्तेचा टक्का वाढल्याचे दिसून येत आहे.

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
● बीड, रविवार 24 मे 2026



# सिरसाळ्यात आज बुद्ध रुपाचे अनावरण व बुद्ध विहाराचे लोकार्पण

## सामाजिक न्याय मंत्री ना.संजय सिरसाट यांच्या हस्ते लोकार्पण
## ना. पंकजाताई मुंडे, माजी मंत्री आ. धनंजय मुंडे तसेच डॉ. हर्षवर्धन कांबळे यांची उपस्थिती









■ सिरसाळा : अतुल बडे

परळी तालुक्यातील सिरसाळा येथे आज रविवार दि. २४ मे २०२६ रोजी तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या बुद्धरूपाचे अनावरण म्हणजेच बुद्धांच्या मुर्तीची स्थापना तसेच सम्राट अशोक बुद्ध विहाराच्या लोकार्पणाचा भव्य दिव्य ऐतिहासिक सोहळा आज होणार आहे. हा लोकार्पण सोहळा /अनावरण राज्याचे सामाजिक न्याय मंत्री ना. संजय सिरसाट यांच्या हस्ते होणार असून या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी माजी सामाजिक न्याय मंत्री आ. धनंजय मुंडे तर विशेष उपस्थित म्हणून पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे , प्रधान सचिव- सामाजिक न्याय विभाग महाराष्ट्र राज्याचे डॉ. हर्षवर्धन कांबळे असणार आहेत. या महोत्सवानिमित्त परिसरात उत्साहाचे आणि मंगलमय वातावरण निर्माण झाले असून पंचक्रोशीतील नागरिकांमध्ये मोठी उत्सुकता पाहायला मिळत आहे. मध्य प्रदेशातील भीम जन्म भूमी महू येथून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे अस्थिकलश देखील अभिवादना करिता या ठिकाणी आणण्यात आले आहे.

कार्यक्रम सुनियोजित पार पाडण्यासाठी सिरसाळ्यातील संबंध बौध्द उपासक,समाज बांधव महेनत घेत आहेत. सम्राट अशोक बुद्ध विहार, कुशी नगर, सिरसाळा येथे होणाऱ्या या कार्यक्रमास विविध मान्यवर, भन्तेजी, सामाजिक कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी तसेच बौद्ध बांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. आयोजकांनी सर्व नागरिकांना उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ८ वाजता पंचशील धम्म ध्वजाचे ध्वजारोहण करून होणार असून पूज्य भन्ते डॉ. धम्मप्रिय महास्थवीर (अध्यक्ष, भीम जन्मभूमी महू, मध्यप्रदेश) यांच्या हस्ते हा विधी पार पडणार आहे. त्यानंतर सकाळी ८.३० वाजता बुद्ध जयंतीच्या पावन पर्वावर बुद्ध रूपाची भव्य शोभायात्रा सम्राट अशोक बुद्ध विहारातून प्रारंभ होऊन शहरातील प्रमुख मार्गाने भ्रमण करीत पुन्हा विहारात दाखल होईल. सकाळी ११.३० वाजता पूज्य भिक्खू संघदान व उपासकांना भोजनदानाचा कार्यक्रम होणार आहे. दुपारच्या सत्रात पूज्य भन्ते डॉ. धम्मप्रिय महास्थवीर यांच्या शुभहस्ते बुद्ध रूपाचे अनावरण करण्यात येणार आहे. यावेळी विविध भन्तेजींची प्रमुख उपस्थिती लाभणार असून धम्मदेशना देखील आयोजित करण्यात आली आहे. सायंकाळी ७ वाजता सम्राट अशोक बुद्ध विहार लोकार्पण सोहळा पार पडणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्राचे माजी सामाजिक न्याय मंत्री आ. धनंजय मुंडे राहणार आहेत. उद्घाटक म्हणून सामाजिक न्याय मंत्री महाराष्ट्र राज्य ना. संजय शिरसाट साहेब उपस्थित राहणार आहेत. विशेष उपस्थिती म्हणून महाराष्ट्र राज्याचे पशुसंवर्धन तथा पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे तसेच प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग महाराष्ट्र शासन डॉ. हर्षवर्धन कांबळे उपस्थित राहणार आहेत.या महोत्सवात महाराष्ट्राच्या आवाजाचा बादशाह म्हणून प्रसिद्ध असलेले ख्यातनाम गायक आनंदजी शिंदे यांच्या प्रभावी उपस्थितीत भीम गीतांचा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून तो या सोहळ्याचे प्रमुख आकर्षण ठरणार आहे.

### आनंद शिंदे यांच्या भीमगीतांचा रंगणार जल्लोष तर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या अस्थिकलश देखील अभिवादना करिता महू वरुन आणले

कार्यक्रमासाठी विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय पदाधिकारी तसेच बौद्ध समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. सम्राट अशोक बुद्ध विहार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती, यशोधरा महिला मंडळ सिरसाळा यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.आयोजकांनी पंचक्रोशीतील सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून बुद्ध व धम्माच्या या प्रेरणादायी सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.



## चांगला समाज घडवण्यासाठी व्यसनमुक्त रहा आणि मुलांना चांगले संस्कार द्या ; गोविंदगडाचे महंत अशोक महाराज शास्त्री यांचे प्रतिपादन

■ आष्टी (प्रतिनिधी)

जर आपल्याला एक चांगला आणि आदर्श समाज घडवायचा असेल, तर प्रत्येकाने व्यसनमुक्त राहिले पाहिजे. आपल्या मुलांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता चांगले शिक्षण आणि उच्च संस्कार दिले पाहिजेत. तसेच कौटुंबिक स्वास्थ्य टिकवण्यासाठी महिलांनी आपल्या सासू-सासऱ्यांना स्वतःचे आई-वडील मानून त्यांच्या वृद्धापकाळात त्यांची योग्य काळजी व सांभाळ केला पाहिजे, असे आवाहन गोविंद गडाचे महंत अशोक महाराज शास्त्री यांनी केले. आष्टी तालुक्यातील कासेवाडी येथे दरवर्षीप्रमाणे आयोजित करण्यात आलेल्या अखंड हरिनाम सप्ताहात पाचवे कीर्तनपुष्प गुंफताना ते बोलत होते. यावेळी कासेवाडी आणि परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कीर्तनादरम्यान बोलताना महाराजांनी सध्याच्या शिक्षण पद्धतीवर आणि वाढत्या भ्रष्टाचारावर तीव्र चिंता व्यक्त केली. संत भगवान बाबा यांनी दिलेल्या 'जमीन विका पण मुलांना शिकवा' या तत्त्वाचे स्मरण करून देत ते म्हणाले की, आज शिक्षणाचे महत्त्व सर्वांनाच माहीत आहे, परंतु सर्व समाज अशिक्षित होता त्यावेळेस संत भगवान बाबा यांना शिक्षणाचे महत्त्व कळाले होते. आज शिक्षण क्षेत्रात नेमके काय चालले आहे, हे नुकत्याच पार पडलेल्या 'नीट' परीक्षेच्या गोंधळावरून स्पष्ट दिसून येते. वैद्यकीय आणि इतर उच्च शिक्षणाच्या जागा कमी आणि विद्यार्थ्यांची संख्या जास्त असल्याचा गैरफायदा घेतला जात असून, यामुळे शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार बोकाळला असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पुढे बोलताना त्यांनी समाजाच्या बदलत्या मानसिकतेवर आणि संतांच्या भूमिकेवर प्रकाश टाकला. आज समाजामध्ये ज्याच्याकडे मोठी गाडी आहे, त्यालाच मोठे महंत मानण्याची चुकीची प्रथा पडत चालली आहे. परंतु ज्यांच्याकडे मोठी गाडी नाही, असेही अनेक थोर संत समाजात कार्यरत आहेत हे लोकांना समजत नाही. संतांनी समाजात वावरताना कधीही गरीब-श्रीमंत असा भेदभाव किंवा दुजाभाव ठेवू नये, असे सांगत त्यांनी सर्वांना समानतेची वागणूक देण्याचा संदेश दिला. गोविंद गडावर चालणाऱ्या विविध सामाजिक व धार्मिक उपक्रमांची माहिती देताना महंत शास्त्री म्हणाले की, गडावर भविष्यातील उत्तम कीर्तनकार आणि अधिकारी घडवले जात आहेत. तेथे अनेक गरजू मुलांचे संगोपन केले जात असून त्यांना पारंपरिक धार्मिक शिक्षणासोबतच स्वावलंबी बनवणारे व्यावसायिक शिक्षणही दिले जात आहे. तसेच गडावर गोपालन करून गोमातेची सेवाही मनोभावे केली जाते. एक चांगला समाज निर्माण करायचा असेल तर प्रत्येकाने त्याची सुरुवात आधी स्वतःच्या गावापासून केली पाहिजे, असे मत त्यांनी मांडले. या कीर्तन सेवेमध्ये अशोक महाराज शास्त्री यांनी जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या "तुम्ही संत मायबाप कृपावंत | काय मी पतित कीर्ती वाणू ॥ अवतार तुम्हां धराया कारणें | उद्धराया जन जड जीव ॥" या प्रसिद्ध अभंगाचे अतिशय मार्मिक विवेचन केले. या निरूपणातून त्यांनी उपस्थितांना भारतीय संस्कृती, कौटुंबिक मूल्ये आणि संतांचे समाजातील स्थान याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. हा कीर्तन सोहळा श्रवण करण्यासाठी कासेवाडी सह परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## दौनापूर येथे विज्ञान आधारित अन्नद्रव्य व अन्य निविष्ठा व्यवस्थापनाबाबत समग्र जागरूकता अभियान संपन्न

■ (सिरसाळा अतुल बडे)

परळी वैजनाथ, दि. २३ : दीनदयाल शोध संस्थान संचलित कृषी विज्ञान केंद्र, अंबाजोगाई यांच्या वतीने "विज्ञान आधारित अन्नद्रव्य व अन्य निविष्ठा व्यवस्थापन अवलंबन" या विषयावर समग्र जागरूकता अभियानांतर्गत दौनापूर, ता. परळी, जि. बीड येथे शेतकरी मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमास कृषी विज्ञान केंद्राचे पीक संरक्षण तज्ञ डॉ. प्रदीप सांगळे, अभियांत्रिकी तज्ञ श्री. रेणापूरकर तसेच तालुका आत्मा विभागाचे मेश्राम सर उपस्थित होते.

कार्यक्रमात मार्गदर्शन करताना डॉ. प्रदीप सांगळे यांनी येणाऱ्या खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर हवामानानुसार पिकांची निवड करणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगितले. वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या हवामान अंदाजाचा अभ्यास करून शेतकऱ्यांनी पिकांचे नियोजन करावे, असे त्यांनी नमूद केले. तसेच योग्य वाण निवड, बीजप्रक्रिया, अन्नद्रव्य व्यवस्थापन, कीड व रोग व्यवस्थापन या बाबींवर त्यांनी सखोल मार्गदर्शन केले.

यावेळी उपस्थित रेशीम उत्पादक शेतकऱ्यांना येणाऱ्या हंगामात तुती पिकावरील कीड व रोग व्यवस्थापन याबाबत विशेष माहिती देण्यात आली. तसेच यावर्षीच्या हमीभावाचा विचार करून पीक पद्धतीत बदल करण्याची गरज अधोरेखित करताना शेतकऱ्यांनी तूर, उडीद व मूग यांसारख्या अधिक हमीभाव असलेल्या पिकांना प्राधान्य द्यावे, असे आवाहन करण्यात आले.

शेती उत्पादन खर्च कमी करण्यासाठी रासायनिक खते व कीटकनाशकांवरील खर्चात बचत करणे आवश्यक असून नैसर्गिक व सेंद्रिय शेतीचा अवलंब ही काळाची गरज असल्याचे डॉ. सांगळे यांनी स्पष्ट केले. यावेळी जीवामृत, घनजीवामृत, निंबोळी अर्क, दशपर्णी अर्क, अग्निअस्त्र यांसारख्या नैसर्गिक निविष्ठा तयार करण्याच्या पद्धती व त्यांचा शेतात प्रभावी वापर याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर बायोफर्टिलायझर्स व जैविक घटकांचा वापर करून अन्नद्रव्य व्यवस्थापन करण्यावरही त्यांनी भर दिला. कृषी अभियांत्रिकी विषयावर मार्गदर्शन करताना श्री. रेणापूरकर यांनी बैलचलित पेरणी यंत्र, मशागतीची यंत्रे, फवारणी यंत्रे, सौरऊर्जेवर चालणारी कृषी उपकरणे याबाबत माहिती दिली. तसेच नवीन कृषी तंत्रज्ञानाचा अवलंब, पाण्याचा सुयोग्य वापर, सूक्ष्म सिंचन पद्धती आणि ड्रोनद्वारे फवारणी या आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे शेती अधिक कार्यक्षम व खर्चिकदृष्ट्या फायदेशीर होऊ शकते, असे त्यांनी सांगितले. समग्र जागरूकता अभियानाच्या अनुषंगाने एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापनासाठी सेंद्रिय व नैसर्गिक शेतीचा अवलंब करणे आवश्यक असल्याचेही मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमात तालुका आत्मा विभागाचे मेश्राम सर यांनी शेतकऱ्यांना महाडीबीटी पोर्टल अंतर्गत उपलब्ध योजनांची माहिती दिली. यावर्षी सोयाबीन, तूर, उडीद व मूग बियाणे हे शेतकरी गटांना ऑनलाइन अर्जानंतर उपलब्ध होणार असल्याचे सांगून शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर वेळेत अर्ज करण्याचे आवाहन त्यांनी केले.या कार्यक्रमास दौनापूर परिसरातील मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. शेतकऱ्यांनी विविध कृषी विषयांवर प्रश्न विचारून तज्ञांकडून मार्गदर्शन घेतले. कार्यक्रमामुळे विज्ञान आधारित शेती, नैसर्गिक निविष्ठांचा वापर, आधुनिक कृषी तंत्रज्ञान व हवामानानुसार पीक नियोजन याबाबत शेतकऱ्यांमध्ये जनजागृती झाल्याचे दिसून आले.